**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**

**सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.१३९/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४० ०३२, दिनांक : २७ नोव्हेंबर २००७**

वाचा: १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्रमांक:ग्रापापु१००३/प्र.क्र.२५६/ पापु-०७, दिनांक १० जुलै २००६

शासन निर्णय:

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्याबाबतचे आदेश संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १० जुलै, २००६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. या शासन निर्णया सोबत जोडण्यात आलेल्यां **परिशिष्ट- १** व **परिशिष्ट- ३** मध्ये अनुक्रमे स्वतंत्र व प्रादेशिक योजनेस हे देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीची पात्रता व त्यांनी पूर्ण करावयाच्या अटी देण्यात आल्या आहेत. त्यामधील अटीनुसार हे अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात स्वतंत्र व प्रादेशिक योजनासाठी आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी किमान ५०% वसूली होणे आवश्यक आहे.

२. स्वतंत्र ग्रामपंचायतींना तसेच जिल्हा परिषदांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. आतापर्यंत केवळ १२ जिल्हा परिषदांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तसेच जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी उपलब्ध असलेल्या एकुण निधी पैकी रु.२८७५.०० लक्ष अनुदान या शासन निर्णया सोबतच्या विवरणपत्रात संबंधित जिल्हा परिषदांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार पुढील अटी व शर्तींच्या आधारे वितरीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.

(१) सदर अनुदान संबंधित जिल्हा परिषदेने आहरीत करुन ते जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीत जमा करावे.

(२) या अनुदानातून ज्या योजनांसाठी निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. त्या योजनांची यादी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. तोपर्यंत सदर अनुदानातून खर्च करु नये.

३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी राज्यस्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतून रु.२८७८.००लक्ष इतका निधी या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार संबंधित जिल्हा परिषदांना मुक्त करण्याची कार्यवाही या विभागाच्या कार्यासन पापु-०४ / पापु-१० मार्फत करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७११२७१७१६५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(श्री. श्री. घोलप)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्यक व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दुसरा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४) उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५) उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१६) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१७) अवर सचिव, कार्यासन पापु-०४ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१८) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व नियंत्रण अधिकारी व कार्यासन अधिकारी.
१९) संगणक कक्ष
२०) निवडनस्ती (पापु-०७)

H-1895-1a

\\Ws07a\I\BACKUP~1\ASSIST~1\CR1390~1\CR 139 07 GR 201107.doc

# विवरणपत्र

शासन निर्णय, पापुवस्ववि, क्र.ग्रापापु १००७/प्र.क्र.१३९/पापु-०७
दिनांक २७ नोव्हेंबर, २००७ चे सहपत्र

## देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाचे जिल्हयांना वाटप

| अ.क्र | जिल्हा परिषद | सद्यस्थितीत उपलब्ध करुन देण्यात येत असलेले प्रोत्साहन अनुदान (रू.लाखात) |
| --- | --- | --- |
| १ | २ | ३ |
| १ | ठाणे | १२५.०० |
| २ | रत्नागिरी | २५.०० |
| ३ | पुणे | ४००.०० |
| ४ | सांगली | ८००.०० |
| ५ | सातारा | १००.०० |
| ६ | सोलापूर | ६००.०० |
| ७ | कोल्हापूर | १७५.०० |
| ८ | बीड | ३५.०० |
| ९ | अमरावती | ३००.०० |
| १० | अकोला | १००.०० |
| ११ | चंद्रपूर | २००.०० |
| १२ | गडचिरोली | १५.०० |
| एकूण | | २८७८.०० |

(श्री. श्री. घोलप)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

--------

H-1895-2.

\\Ws07a\f\BACKUP~1\ASSIST~1\CR1390~1\CR 139 07 GR 201107.doc